# तंबुरा वीणा

१८८०४
म. ग्रं. सं. ठाणें.
विषय काव्य
सं. क्र. २३८३

REFBK-0022504
REFBK-0022504

लेखक श्री.
चैतन्यानंद योगीराज
सोमनाथ.
श्री.
क्षीरसागर.

काव्य
2343
22508 काव्य
संदर्भ
2343

॥ श्री ॥



पुत्रवत प्रेम करणारे पूजनीय

# श्रीमान् दादासाहेब नाईक (मुंबई)

यांस

# सप्रेम अर्पण

शनिवार दि. २६-१-७४

REFBK-0022504
REFBK-0022504

चैतन्यानंद योगीराज

सोमनाथ बा. क्षीरसागर

# ॥ भवानीमातेची आरती ॥

भवानी विंध्याचलवासिनी चौदा भुवनाची ।
स्वामिनी महिषासुरमर्दिनी ऐसी देखीली ॥धृ॥

कांसे कसूनीया पिताबर हाती हाथसर पायीं बिंदाचा ।
तोडर चाले दैत्यावर ऐसी देखीली ॥१॥

कोपा भरूनीया भंकोळी सुरंग ल्याली चोळी जडीत पदकांची ।
झळाळी मळवट शोभे कपाळी ऐसी देखीली ॥२॥

गळयात गरसोळी केळ एकावली सरी साखळी ।
ताईत शोभे कानी बाळी ऐसी देखीली ॥३॥ भवानी

कमरी कटिबंध बहुरंद शखडी डोईमुंद गंध पुष्पांचा ।
सुगंध अंबाघरी आनंद ऐसी देखीली ॥४॥

मुखी शोभतसे तांबूल बाकी मुक्ताफळ डोई घातली ।
त्रिवेणी नयनी काजळ ल्याली ऐसी देखीली ॥५॥ भवानी

लज्जा वाटतसे चंद्रासी देखुनी मुखकमलासी प्रसन्न होउनी ।
भक्तासी वर दे या समयासी ऐसी देखीली ॥६॥ भवानी

दास सोमनाथ शरण येवूनी सांगतो तुजला ।
ठेवी कृपा तूं भक्तावरी ऐसी देखीली ॥७॥ भवानी

# हृद्गत

सामर्थ्य आहे चळवळीचे । जो जो करील तयाचे ।
परी अधिष्ठान पाहिजे । भगवंताचे ।।

माझे प. पू. योगेश्वर, शिवभक्त, श्रीसद्गुरु दादा महाराज हिंगे, माझे तीर्थस्वरूप कै. ब्रह्मश्री वे. शा. सं. बाळशास्त्री क्षीरसागर व माझी कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी व आदि देवता यांना वंदन करून आज "तरंग – वीणा" हे पहिले पुष्प अर्पण करणेची सेवा घडत आहे म्हणून फार आनंद होत आहे.

सदरहू "तरंग – वीणा" हे पुष्प सहज स्फूर्तिदायक श्रीसरस्वती-च्याच मुखांतून निघून वीणारुपी माझेकडून वदविले जात आहे. तसें म्हणाल तर मला 'संगीत' शास्त्राभ्यास अगदीच कमी. परंतु ही सेवा जी घडत आहे ती देवतांनीच घडवून आणली व घडवीत आहे ही माझी संपूर्ण श्रद्धा आहे.

या कामी मला सरस्वति परमार्थ निकेतन मधील सन्माननीय व्यक्तींचे बहुमोल असें सहाय्य झाले त्याबद्दल मी त्यांचा शतशः कृतज्ञ आहे.

– चैतन्यानंद योगीराज
सोमनाथ बा. क्षीरसागर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
2363
दा. क्र. 22508
ग्रंथ शाखा (प्रथम मत)

# मनोगत

मला माझ्या जीवनात परब्रह्म स्वरूपाचा आनंद मिळवून देणारे चैतन्यानंद स्वामी उर्फ अण्णा यांनी लिहिलेले "तरंग वीणा" हे पुस्तक प्रकाशित होत आहे हे पाहून मला फार आनंद होत आहे.

प. पू. अण्णा उर्फ चैतन्यानंदस्वामी हे मुळचे सातारा जिल्ह्यातले. यांचे मूळ घराणें "शास्त्री" घराणें म्हणून प्रसिद्ध आहे. यांचे वडील कै. ब्रह्मश्री वे. शा. सं. बाळशास्त्री रावजीशास्त्री क्षीरसागर हे फार मोठे विद्वान पंडित होऊन गेले, त्यांचे हे कनिष्ठ चिरंजीव होय. साहजिकच दैवी संपत्तीचा लाभ त्यांच्या मूळ घराण्यापासून ती. प. पू. अण्णांना मिळालेमुळे दैवी कृपा त्यांच्यावर परिपूर्ण आहे यात शंकाच नाही.

शांत स्वरूप, आनंदी चेहरा, मोकळा स्वभाव व भोळा भाव ही त्यांच्या निष्काम भक्तीची साक्ष सर्व भक्तगणांस देत आहे.

चुकणे हा मानवाचा धर्म आहे. भोळ्या भक्ताच्या भोळेपणाचा फायदा घेणारे लोकही त्यांच्या जीवनात आलेले मी पाहिले आहेत. पण प. पू. अण्णांच्या निष्पाप वृत्तीमुळे तेच लोक फशी पडले. पण भोळा भावच परमेश्वरास फार आवडतो. म्हणूनच परमेश्वराचे साह्य त्यांना भरपूर असलेमुळे, शिवाय त्यांचे श्री. सद्‌गुरू प. पू. **दादा महाराज हिंगे,** नागपूर, यांचा कृपाशिर्वाद चांगलाच असलेमुळे त्यांच्याच हृदयातून निर्माण झालेले हे भक्तिरसाचे मधुर बोल कांही अभंग रूपाने व कांही पदांच्या रूपानें "तरंग-वीणा" या पुस्तकातून आज प्रकाशित केले जात आहेत.


दुसऱ्यांच्या जीवनात 'चैतन्य' निर्माण करण्याचे सामर्थ्य अप्रतिम असलेमुळे त्यांचे श्रीसद्‌गुरू प. पू. दादामहाराज हिंगे यांनी त्यांना "चैतन्यानंद" ही पदवी दिली आहे.

तरी सर्व भक्तगणांस उत्साह, स्फूर्ति व चैतन्य मिळवून देणारे 'तरंग-वीणा' हे पुस्तक आवडेल ही पूर्ण खात्री आहे.

**सौ. ताई मराठे**

सरस्वती परमार्थ निकेतन मंडळ, डोंबिवली.

# — तरंग - वीणा —



कला :- भाई देशपांडे



मराठी ग्रंथ संग्रहालय ठा
दा. क.
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# श्री देवी स्तवन

नमो देव्यै महादेव्यै शिवायै सततं नमः ।
नमः प्रकृत्यै भद्रायै नियताः प्रणताः स्मताम् ।।
सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके ।
शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणी नमोस्तुते ।।
जयंति मंगला काली भद्रकाली कपालिनी ।
दुर्गा क्षमा शिवा धात्री स्वाहा स्वधा नमोस्तुते
शरणागत दीनार्त परिणाय परायणे
सर्वस्यार्तिहरे देवी नारायणी नमोस्तुते ।।
वागर्थाविव संप्रुक्तौ वागर्थ प्रतिपत्तये ।
जगतः पितरौ वन्दे पार्वती परमेश्वरौ ।।

# बारालिंगे

ताल - त्रिताल

सोमेश्वरा, मल्लिकेश्वरा । जगदीश्वरा, गंगाधरा ।।धृ।।
महांकालेश्वरा, ओंकारेश्वरा । परमेश्वरा, नागेश्वरा ।।१।।
केदारेश्वरा, भीमेश्वरा । पार्वतीवल्लभेश्वरा ।।२।।
विश्वेश्वरा, त्र्यंबकेश्वरा । तृतीयनेत्रेश्वरा ।।३।।
वैजनाथेश्वरा, नागनाथेश्वरा । भस्मर्चचितेश्वरा ।।४।।
रामेश्वरा, घृष्णेश्वरा । मृत्युंजयेश्वरा ।।५।।
सोमनाथ म्हणे, बारा लिंगेश्वरा । वंदितो मी सर्वेश्वरा ।।६।।



# श्री गणेश

ताल - एकताल

हे गणेश जगपाला । करितो तुज नमनाला ।।
त्राता तूं विश्वाचा । म्हणती मोरया ।।१।।

मुळारंभी श्री गणेश । अष्टपदी विनायक ।।
तारीसी संकटास । म्हणती विघ्नहर्ता ।।२।।

भक्त तुला जे पुजती । होती जगी ते विजयी ।।
सोमनाथ तुज विनवी । ठेवी सुखी जना ।।३।।

# खंडेराव

मल्हारी खंडेरावा । जेजुरीच्या खंडेरावा ।।धृ।।

गडांत गड जेजुरीचा गड । नवलाख पायरी दगड ।।
भक्त येती दर्शनाला ।।१।। जेजुरी

तुला बेलभंडाराची गोडी । पोशाखी पूजा हळदीची पुडी ।।
भक्त उधळी दरबारी ।।२।।

कडेपठारी बेलभंडार तळी । यळकोट यळकोट चांगभली
भक्त वंदि कडेपठारा ।।२।। जेजुरी

तूं कुलदैवत महाराष्ट्राचं । घरोघरी मोठ्या मानाचं ।।
भक्त पुजी बेल भंडारा ।।४।। जेजुरी

तुझा अवतार शंकराचा । मुजरा घ्यावा सोमनाथाचा ।।
उधळी बेलभंडारा ।।५।। जेजुरी.

# सरस्वति

ताल – त्रिताल

येई सरस्वति मम मंदिरीं । घेवुनी वीणा वाम अंगीं ती ।।धृ।।
नाद वीणाचा करस्पर्शानीं । झणझणझणतो झंकारांनीं ।।
आनंद फुलला स्वमनी ।।१।।
शुभ्र वस्त्र परिधान शरिरी । गळी शोभतो कंठमणी ।।
विस्मय वाटे रूप पाहुनी ।।२।।
मयूर वाहन बाजू असुनी । काढी पिसारा बहु डोलानी ।।
नाचत कुदत फिरे भोवतीं ।।३।।
सामवेद गायन वदनी । साथ ती राही वीणांनीं ।।
सप्त सुरांच्या तालावरती ।।४।।
विद्याधनाची आराध्य दैवत । म्हणुनी पूज्य भक्तगणांत ।।
करी ज्ञानमय सर्वांनाही ।।५।।
सोमनाथ प्रार्थितो तुजला । विद्याधन दे तूं भक्ताला ।।
आशीस सकला देवुनी ।।६।।

# गुरुदेवदत्त

ताल - त्रिताल

दत्त दिगंबर म्हणती तुजला । नृसिंह सरस्वती अवतारा ।।धृ।।
गाणगापूरी वास करिशी । श्रीपादवल्लभा ।।
औदुंबरीवृक्षा छायेमध्ये राही जगदोद्धारा ।।१।।
कांखी झोळी दंड त्रिशूळ । घेवुनी स्वकरा ।।
वेदरूपाश्वान प्रगटून गायत्री गायीसमा ।।२।।
ब्रह्मा विष्णू शिव मिळूनी । त्रिमूर्तीश्वरा ।।
कलीयुगी तूं दत्त म्हणूनी । पावन करी भक्ताला ।।३।।
भीमातटी संगमतीरी । गुरुदत्तात्रया ।।
प्रगटी तूंच दत्त म्हणूनी । देशी दर्शन भक्ताला ।।४।।
मातापिता अनुसया अत्रि । दत्ता दिगंबरा ।।
सोमनाथ लागे चरणी । ठेवी कृपा भक्तगणा ।।५।।

# महालक्ष्मी

राग – ललत
ताल – त्रिताल

जावूं चला कोल्हापुरासी । महालक्ष्मीच्या महादर्शनासी ।।धृ।।

फार दिसांची मनीषा होती । स्मरणी माझ्या झाली जागृती ।।
म्हणुनी मजला पटली महती ।।१।।

बहुसुकृताची असूनी जोडी । म्हणुनी मजला लागली गोडी ।।
येवुनी तुझ्या दर्शनासी ।।२।।

सहचचि बघतां तव मंदिरी । तेजःपुंज तो तुझी कांती ।।
दिसली वस्त्रालंकारी ।।३।।

खणानारळाची भरली ओटी । साडी चोळी बांगडी पदरी ।।
धरूनी हास्य ओठांवरती ।।४।।

वाहन तुझें गज-गतीचें तें । दोन्ही बाजुला डोलत असते ।।
रास धनाची करस्पर्शानी ।।५।।

मोहक सुंदर रूप तुझे तें । दर्शन घडलें त्याच क्षणातें ।।
नमले मस्तक तुझ्याच चरणी ।।६।।

आई तुझीही अशीच कृपा । ठेविसी तूं या सोमनाथबाळा ।।
हीच प्रार्थना तव चरणी ।।७।।

# पंढरपूर

भावगीत
ताल - दादरा

विठ्ठल विठ्ठल मुखी म्हणा । पंढरीचे तुम्ही कौतूक जाणा ।।धृ।।

आषाढी कार्तीकी यात्रेला । जमती भक्तगण पंढरीला ।
बघण्या अपुल्या सावळयाला ।।१।।

चंद्रभागेच्या वाळवंटात । विठ्ठल गजर चाले थाटात ।
दुमदुमला नाद पंढरपुराला ।।२।।

मूर्ती तुझी ती गोजोरी । युगे अठ्ठावीस वीटेवरी उभी ।
संकटी भक्ताच्या धावूनी येई ।।३।।

दिंडया पताका नाचती कुदती । मृदुंग टाळ बहु वाजती ।
सोमनाथ वंदि विठ्ठलापदी ।।४।।

# कालिमाता

ताल – त्रिताल

कालिमातेचा करा तुम्ही हो जय जय जयजयकार ।
जयजयकार जयजयकार कालिमातेचा जयजयकार ।।धृ।।
अवतार तुझा नवदुर्गेतील । भक्तास्तव बहुमोल ।
चंड-मुंडादी दैत्यास्तव । होई कर्दन काळ ।।१।।
रूप तुझे ते अक्राळ विक्राळ । मुंडमाळा गळी हार ।
हाती घेवुनी शस्त्रे धारेदार । दुष्टांचा संहार ।।२।।
मुखी शोभती लांब जीभाणी । वळवळते प्राशनी ।
अग्नि - कुंड डमरु धरूनी । गर्जना ती फार ।।३।।
तांडव नृत्य नयनमनोहर । भीषण भुभूत्कार ।
थय थय थय थय काली नाचे । पृथ्वीला तो भार ।।४।।
रुद्र रूप ते घेई भयंकर । रक्त प्राशीशी फार ।
घेवुनी शत्रूचे ते बलिदान । होशी तृषाधार ।।५।।
देवदेवता तुला प्रार्थिती । शांत तुझ्या स्वरूपी ।
सोमनाथ हा तुझ्याच चरणी । लागे या कारण ।।६।।

# प्रभुलीला

ताल – दादरा

हांसत नांचत आली राधिका यमुना तीरी ।
घेवुनी अपुल्या परिचारिका ।।धृ ।।
कृष्ण सख्याची मधूर बासरी । वाजे मंजुळ नादलहरी
सप्तसुरांच्या तालावरती ।।१।।
नाद मिळाला राधिकेला । अधीर झाली ती बघण्याला
ठुमकत टाकी पावलासी ।।२।।
हास्य दिसले ओंठावरती । अतूर नयनी उत्सूक झाली
गोरी मोरी कांती झाली ।।३।।
छेडू नको तू तुझी बांसरी । जीव माझा रे फार घाबरी
अगम्य लीला तुझी मजवरी ।।४।।
वेडे केले मजला जीवनी । नादब्रह्म मज मंत्र देवुनी
सोमनाथ तुझ्या राही वंदनी ।।५।।

# श्रीराम

ताल – एकताल

श्रीरामा दशरथसुता । घ्यावा प्रणाम तूं आमुचा ॥धृ॥
कैकयोच्या वचनास्तव । घडला तुला वनवास ।पितृ ऋण मुक्ति काज ॥१॥
क्षण येता तुझें पदस्पर्श । सती अहिल्या गेली उद्धरून ।
झाली जागृत शीलांतून ॥ २ ॥
शबरीची बोरें उष्टावलेलीं । भक्ति भाव श्रद्धा पाहुनी ।
केली ग्रहण आवडीनं ॥ ३ ॥
सेतुबंधनी टाकीयले गोटे । 'राम राम' शब्द नामानें ।
केला सेतूबंध हनुमानानं ॥ ४ ॥
दशमुखी अहंकारी रावण । केला दाही दिशा विजय ।
करूनी त्याचा तूं छेद ॥५॥
सेवावृत्ती दावी हनुमानाची । साक्ष हृदयीं दर्शनाची ।
सदोदीत सेवावृत्तींच ॥६॥
अयोध्यापुरी होतें 'रामराज्य' । सोमनाथ धरी चरण ।
ठेवा 'रामराज्य' त्रिभूवन ॥७॥

# प्रेम भाव

ताल – केरवा

प्रेम द्यावें प्रेम घ्यावें । जीवनसुख पहावे जीवनी ॥धृ॥
सुखाच्या उंच शिखरी । प्रेमनाथ घुमती भूवरी ।
भाव देती एकमेका ।विलीन होवूनी एकरूपी ॥१॥
राधाकृष्णाचीच जोडी । भक्तिप्रेमाचीच गोडी ।
घ्यावी अपुल्या देहांतरी । करूनी प्रीती सर्वांवरी ॥२॥
जगी धन्य तोचि होई । ठेवी प्रेमभाव हृदयीं ।
सोमनाथ सांगे सर्वां । ठेवा प्रेमामृत हृदयीं ॥३॥

# शिवचिंतन

अभंग

शिवाचें स्मरण । असें गंगास्नान
नित्य तें करून । व्हावें भाग्यवान् ।। धृ ।।
शिवाची ती मूर्ती । देई तुम्हां स्फुर्ती
धरूनी संगती । करावी प्रगती ।।१।
शिवाचें तें ध्यान । अध्यात्मिक ज्ञान
करूनी प्रसन्न । व्हावें धनवान ।।२।।
शिवाची ती शक्ती । राही आदिशक्ती
टाळील आपत्ती । ठेवूनी ती प्रीती ।।३।।
शिवाचा महीमा । षडाक्षरी नामा
करा नित्य नेमा । येई सदा कामा ।।४।।
म्हणे सोमनाथ । जगी तोचि धन्य
मुखी शिवनाम । घेई सदा काळ ।।५।।

# देवभाव

अभंग

भावाचा जो देव । तोचि महादेव
जाणें तोचि भक्त । आहे ज्याचा भाव ।।धृ।।
भावावीण भक्ति । व्यर्थ जाई शक्ति
जन्माची कसोटी । नसे त्या गणती ।।१।।
भाव ज्याच्या मनी । जगी धन्य होई
जन्म सार्थ होई । मोक्षपदी जाई ।।२।।
ज्ञानाची ती सक्ती । नसे भावाप्रती
ठेवा एकचित्ती । भक्तीची ती प्रीती ।।३।।
देवांचा तो देव । स्मरा महादेव
नको दुजा भाव । अंतरीची हांव ।।४।।
म्हणे सोमनाथ । सर्वा ठायी एक
धरावा भावार्थ । शिवाचा तो ध्यास ।।५।।

# पांडुरंग

अभंग

सांवळया विठ्ठला । येतो पंढरीला
बघण्या अपूल्या । पंढरीरायाला ।।धृ।।

चंद्रभागे तीरी । युगे अठ्ठावीस
वास पंढरीस । राही रात्रंदीन ।।१।।

आषाढी कार्तीकी । पंढरीची वारी
सदोदीत घाली । भक्त वारकरी ।।२।।

चंद्रभागे मध्यें । स्नान जे करिती
पाप मुक्त होती । तुझें जळ स्पर्शी ।।३।।

पंढरीचा तुझा । महीमा वर्णीला
तुका – ज्ञानदेव । एकनाथ – गोरा ।।४।।

सखू – मीरा – जना । त्यांच्या रक्षणासी
उभा तूं राहीला । सदा सर्व काळीं ।।५।।

दामाजीसाठीं तूं । चाकर झालासी
भरीला पैका तूं । भर दरबारी ।।६।।

संत – साधू भक्त । कितीक तारीले
तुझ्या दरबारी । भक्ती प्रेम भावें ।। ७ ।।

सोमनाथ भजे । पंढरीरायासी
ठेवा कृपा तुम्ही । सर्व जनांवरी ।।८।।

# कृपादृष्टि

अभंग

नको करूं देवा । वक्रदृष्टि माझी
राहूं दे सदा ती । कृपादृष्टि तुझी ।।धृ।।

नको दूर लोटूं । मज आहे ओढ
लक्ष निरंतर । ठेवी देही गाढ ।।१।।

नको मज धन । आणि ती दौलत
सदा मज ठेवी । हृदय हिंमत ।।२।।

नको मज देवूं । मायामोह पाश
माझ्या जीवनाचा । होईल रे नाश ।।३।।

नको मज ठेवूं । मानाचें ते स्थान
ताठ ती राहील । अहंकारी मान ।।४।।

नको मज लावूं । लोभाचे अमीष
राहूनी जाईल । माझे मनी वीष ।।५।।

नको मज देवूं । मत्सराचा साथ
जायबंदी होई । माझा तो हात ।।६।।

नको मज ठेवूं । दुष्टांची संगत
सर्वनाश होई । माझ्या जीवनांत ।।७।।

नको ठेवी दूर । तुझ्यांतून तूं रे
मार्ग तो मोक्षाचा । दावूनी झणी रे ।।८।।

सोमनाथ प्रार्थी । तुज शिवराया
ठेवा कृपादृष्टि । चरणी हो काया ।।९।।

——

# आत्मोद्धार

अभंग

व्यर्थ कां करिशी । वटवट मुखी
अपुल्याच कर्मे । घेशी तूं फजिती ॥धृ॥

कोणत्या कारणी । जन्मा येतो प्राणी
जाणीव याची तूं । कधी बा करशी ॥१॥

पुनरपि जन्म । घेतो प्राणि जैसा
जाया वायी तैसा । फुकटची काया ॥२॥

जन्माचे सार्थक । याचा शोध घ्यावा
खूण पटवून । करावी साधना ॥३॥

जन्माचे रहस्य । करुनिया ध्यावे
संतांचे संगती । देही मिळवावे ॥४॥

इहलोकी कर्म । आणावे जीवनी
सत्कर्मांचे योगी । जीवन जाळूनी ॥५॥

ज्ञानामध्ये ज्ञान । आत्मज्ञान श्रेष्ठ
गुरूचे कृपेने । घ्यावे मिळवून ॥६॥

सोमनाथ सांगे । गुरु हा सोबती
राहूनी जन्माचा । आत्मोद्धार करी ॥७॥

——

# ध्यास

अभंग

आई तुझा ध्यास । लागला मनास ।।
करी धरोनिया । मज चालवावें ।।धृ।।

बाळ तुझा आहे । अज्ञान अजाण ।।
तूंचि माझा माते । करी तूं संभाळ ।।१।।

मज नाहीं कळे । पूजा आणि पाठ ।।
सदा राही दंग । तुझ्या भजनात ।।२।।

शास्त्र पुराणाची । मज नाहीं मती ।।
गुण गान गावी । हीच माझी गती ।।३।।

नको काही मज । सोक्ष आणि मोक्ष ।।
करूनीया घ्यावी । तुझी सेवा गोड ।।४।।

अधिकार द्यावा । तुझ्या चरणाचा ।।
करी सोमनाथ । सदा ही प्रार्थना ।।५।।

# भक्ताची हांक

अभंग

भक्तासाठी देव । घेवोनिया धांव ।।
आला झडकरी । पाहोनिया प्रेम ।।धृ।।

भक्तासाठी झाला । चाकर तो त्याचा ।।
स्वानंदाने सेवा ।। करी नित्य नेमा ।।१।।

भक्ताची महती । सांगे देव जना ।।
माझा भक्त घ्यावा । तुम्ही पाहोनिया ।।२।।

खरा भक्त तोचि । भक्तींत निर्मिला ।।
अविभक्त राही । जगी तो एकला ।।३।।

प्रेमातूनी निघे । भक्ताची ती पूजा ।।
हृदयाची भाव । देती एकमेका ।।४।।

धरावे चरण । शिवाचे तें दृढ ।।
जन्मोजन्मीचे ते । करावे सार्थक ।।५।।

सोमनाथ सांगे । भक्तीचा हा अर्थ ।।
घ्यावा हृदयांत । अंतरीचा भाव ।।६।।

# तुळजापूर

अभंग

माते तुझा वास । असे तुळजापूरी ।।
भक्त जन येती । तुझे दर्शनासी ।।धृ।।

त्रिभूवनाची तूं । झालीसी स्वामिनी ।।
करीशी संभाळ । सकळ भक्तांचा ।।१।।

शुद्ध ज्याचा भाव । असे तुझे ठायी ।।
होतील कृतार्थ । तुझ्या पदस्पर्शी ।।२।।

कल्लोळाचे स्नान । पवित्र तें तीर्थी ।।
पापमुक्त होती । जय 'अंबे' वाणी ।।३।।

गोमुखी अमृत । वाहे रात्रंदिनी ।।
प्राशन करूनी । रोग मुक्त होती ।।४।।

यज्ञ कुंडामाजी । विभूती लावूनी ।।
षड्रिपू जाळी । वैराग्य अंतरी ।।५।।

सभा मंडपी तूं । आहे रात्रंदिनी ।।
शस्त्रे घेवुनी तूं । उभी रक्षणासी ।।६।।

दुष्टांचा संहार । भक्तांचे रक्षण ।।
जगामाजी राही । हेंच तुझे ब्रीद ।।७।।

तेजःपूंज मूर्ती । माते तुझी आई ।।
आत्मसात केली । माझ्या ती हृदयी ।।८।।

सोमनाथ वदे । धरीले चरण ।।
स्वीकारुनी माते । करावा उद्धार ।।९।।

# देव

अभंग

कोण सांगे देव । माझा पांडुरंग
नको दुजा रंग । माझ्या हृदयात ।।धृ।।

दुसरा सांगतो । माझा 'राम' देव
वास शरीरात । राम म्हणुनीच ।।१।।

तिसरा हा सांगे । माझा 'कृष्ण' देव
बघा सर्वां ठायी । दिसे तुम्हां तोच ।।२।।

चौथा सांगे पाहा । माझा दत्तात्रय
फिरे त्रिभूवन । श्रीपाद वल्लभ ।।३।।

पांचवा सांगतो । माझा गजानन
राही अग्रगण्य । सर्व देवतांत ।।४।।

सहावा सांगतो । माझा शिवराय
हृदयी सर्वांच्या । ठायी ठायी वास ।।५।।

सोमनाथ सांगे । शक्ति एक राही
नामभेद रूपे । वास्तव्य ते करी ।।६।।

# अधिष्ठान

अभंग

नको करूं खंत । कोणत्या गोष्टीचा
आहे पाठिराखा । तुझा भगवंता ॥धृ॥

संचिताचे योगे । सुख दुःखे आली
जाणीव मनाची । करूनी ती ध्यावी ॥१॥

क्रियमाण करी । जन्माची सोबत
धरूनी विवेक । सदा सत्संगत ॥२॥

प्रारब्धाची वाट । तुझे आहे हाती
मन-बुद्धि-चित्त । स्थीर ते करूनी ॥३॥

मायाममता ही । ठेवी भगवंता
तन-मन-धन । सर्व अर्पुनिया ॥४॥

जीवनाचा भार । ठेवी भगवंता
जीवशिव एक । आत्मसात करा ॥५॥

देवाचा जो झाला । त्याला दूर नाही
राही त्याचे पाशी । सदा रक्षणासी ॥६॥

जैसा ठेवी देव । तैसे ठेवी चित्त
करूनी प्रसन्न । आनंदीत मन ॥७॥

सोमनाथ सांगे । ठेवा अधिष्ठान
येई सदा कामा । नित्य जीवनात ॥८॥

# क्षमा अपराध

राग – मालकंस

ताल – त्रिताल

कधी करशी तू कृपा मजवरी । घेऊनी जवळी चरणी आई ।।धृ।।

निशिदिनी तुझा ध्यास मनाला । लागला बघ घोर जीवाला ।
घाली पाखर मज तूं आई ।।१।।

भक्त तुला शरण जे येती । रक्षसी त्यांना होऊनी जननी ।
ख्याती तुझी ऐकली स्वमनी ।।२।।

तळमळी जीव तुझ्या वाचोनी । नाही कोणी मजला भुवनी ।
शांत कर तव प्रेमाश्रुनी ।।३।।

बाळक चुकला असेल जरी । क्षमा करावी पाखर घालुनी ।
जीवनी नौका पार करावी ।।४।।

लावूं नको वेळ आता आई । जाणीव घ्यावी मातृपदाची ।
पाहुनी घ्यावा भाव हृदयी ।।५।।

सोमनाथ हा बालक तुझा । ठेवितो मस्तक चरणी तुझ्या ।
कृपा ठेवावी तूं सर्वांवरी ।।६।।

# संचित

ताल – दादरा भावगीत

स्वप्नी माझ्या कधीच नव्हते । परंतु जीवनी माझ्या घडतें ।।धृ।।
कोण कुठूनि येऊनी मिळाला । जीवनी माझ्या समरस झाला ।
भाव देऊनी भाव वाढविला । जिव्हाळयानें शिवमय झाला ।।१।।
प्रेमरसाचा झरा वाहला । आनंदाचा बहर फुलला ।
निसर्गसृष्टीची प्रीती जडली । आत्मस्वरुपी हृदयी नटली ।।२।।
जिव्हाळयाचें नाते जडले । भावभक्तीचे बंधन घडले ।
संचिताची ओळख पहिली । नवजन्मी ती या नटली ।।३।।
देवाघरचें पवित्र देणे । विलीन करूनी हृदयी घेणे ।
न सोडावा मनीं प्रेमझरा । वाहूं द्यावा जीवनसागरा ।।४।।
हृदयाचा सुवास दरवळा । जीव शिवरुपी आनंद फुलवा ।
सोमनाथ देई संदेश सकला । याच देही शांति मिळे मनाला ।।५।।

# शरण

तुला शरण जे येति देवा । त्यांची राखशी पाठ तू सदा ।।धृ।।
दु:खी कष्टी अति गांजलेली । दीन दुबळी बहु असलेली ।
त्यांना द्यावा तुझाचि थारा ।।१।।
दारिद्रयांत फार पीडलेली । भुके कंगाल व्याकुळलेली ।
त्यांना द्यावा तुझा निवारा ।।२।।
रोगराईपणें ग्रासलेली । भीती बाधानीं जखडलेली ।
त्यांना द्यावा तुझा दिलासा ।।३।।
अनाथांचा नाथ तू अससी । दयासागर तुला वदती ।
द्यावा भक्तांना तुझा आसरा ।।४।।
भक्त शरण जे तुला येती । कर सुखी त्यांना तू जगी ।
सोमनाथ धरी चरणाना ।।५।।

# नारायण

राग :- भैरव                                                                      ताल :- दादरा

धांव घेई नारायणा । पाहु किती तुझी वाट ।
जीव माझा होई बेजार ॥धृ॥
धृव बाळे तपस्या केली । ठेविले त्यासी अढळपदी ।
पाहुनी त्याचा भक्तिभाव ॥१॥
गजेंद्रा मगरीने गिळाले । हांक देतां त्यांसी रक्षियले ।
धावुनि गेला रक्षणा ॥२॥
नाम जपता नारायण । प्रल्हाद तरला भवसागरात ।
घेवुनी नृसिंह अवतार ॥३॥
व्रत तुझे सत्यनारायण । भक्त करी कलीयुगात ।
तारीशी त्यांना संकटात ॥४॥
धावा करी बाळ सोमनाथ । घेई धांव भक्त रक्षणार्थ ।
करी त्यांचे पूर्ण मनोरथ ॥५॥

# मुरली

माझा गोपाळकृष्ण मुरारी । फिरे धेनुसह कुंजवनी ॥धृ॥
गोपगोपी अवती भंवती । रासक्रीडा खेळखेळती ।
यमुना काठी पैलतीरी ॥१॥
कृष्णसख्याची मधुर बांसरी । मंजुळ मधुर नाद करती ।
घुमत होती दाही दिशासी ॥२॥
सखी राधा डोलत आली । कृष्ण कन्हैया याच्या स्कंधी ।
भक्ती प्रेमी मुग्ध झाली ॥३॥
नाद भक्तांचा फिरे भोवती । सखी राधा गोपगोपी ।
जावूनी भिडला त्याचे हृदयी ॥४॥
सोमनाथ बाळ वंदी । श्रीकृष्णाला बोले विनूनी ।
ठेवा प्रेम भक्त गणासी ॥५॥

# ध्यानयोग

एक चित्त करूनि स्थीर । बाह्य अंत लावुनी ध्यान ।।धृ।।

मनाची सागरी लहर । विरुन जेव्हा होई स्थीर ।
तेव्हा साधेल ध्यानयोग ।।१।।

द्वैतातून ते अद्वैतात । येईल भेदाभेदातून ।
तेव्हा साधेल ध्यान-योग ।।२।।

सोऽहंची घ्यावी ओळख । अजपाजप ते साधून ।
तेव्हा साधेल ध्यान-योग ।।३।।

प्रकृती पुरुष ते दोन । जाणून आल्याची ती खूण ।
तेव्हा साधेल ध्यान-योग ।।४।।

भक्त देव एक रुपात । जीवा शिवाचे मिलनात ।
तेव्हा साधेल ध्यान-योग ।।५।।

अष्टांग योग तो साधून । जाळी जेव्हा षडरिपूस ।
तेव्हा साधेल ध्यान-योग ।।६।।

सोमनाथाचा ध्यान योग । घ्यावा करुनि आत्मसात ।
तेव्हा साधेल ध्यान-योग ।।७।।

# वंदन

ताल – त्रिताल

वंदन माझें तुला शिवशंकरा सच्चिदानंदा । तारी तारी तूं मला ।।धृ।।
निराकार तूं निर्गुणरुपा । ओंकारमय तूं सदाशिवा ।
भक्ताकारण येशी साकारा ।।१।।
ॐनम:शिवाय षडाक्षरीमंत्र । हृदयीं जपता होऊनी तन्मय ।
करुनी घेशी पावन त्यांना ।।२।।
कैलास तुझे वसतीस्थान । पार्वती गणेश जाया नि सूत ।
नंदी वाहन ठेवी बाजूला ।।३।।
सदाशिव नाम ज्याचे वदनी । होईल जीत भवसागरी ।
होऊनी देवता तूं कल्याणकारी ।।४।।
सोमनाथ हा सदा राही भक्त । प्रार्थितो तुजला रात्रंदीन ।
ठेवी तूं सुखशांति जनाला ।।५।।

# अहंकार

धरुं नको अहंकार । मानवा देही तुझ्या रे भगवान ।।धृ।।
जीव राही शिवरूपात । वास त्याचा शरीरात ।
करी देहाचा संभाळ ।। मानवा ।।१।।
ब्रह्मा विष्णू शिव शंकर । रामकृष्ण हरि विठ्ठल ।
प्रगटती आत्म रुपात ।। मानवा ।।२।।
शांता दुर्गा अंबा भवानी । काली लक्ष्मी सरस्वती ।
येती तुझ्या जीवनात ।। मानवा ।।३।।
असेच देव देवांगण । भक्ति श्रद्धा निष्ठा धरुन ।।
प्रगटी तुझ्या हृदयात ।। मानवा ।।४।।
वंदुनी बोले सोमनाथ । देवदेवता राही जीवात ।
वृथा नको अहंकार ।। मानवा ।।५।।

# सुखदु:ख

भावगीत

ताल – दादरा

सुख सांगावे देवासी । दु:ख सांगावे मनासी ।।धृ।।
सुखदु:खाच्या सांगडी । जाणूनी घ्यावी ओळखुनी ।
जगी तोचि एक राही । भाव तेथे देव पाही ।।१।।
हंसणे रडणे त्याचे करी । मायाममता त्याचे दारी ।।
सुखदु:खाचा वाटेकरी । होतो आप आपुले परी ।।२।।
सुखाच्या ठायी दानव । दुखाच्या ठायी देव ।
पाहुनी एकमेका भाव । घ्यावी खूण अंतरी ।।३।।
पर्वताची शोभा दुरुन । दिसते मनी ही वरून ।
जवळी जाता दुख:मय । देह तो आठवी सुखमय ।।४।।
सोमनाथ विनवी सर्वा । खंत नसावी सुखदु:खा ।
करा प्रेम सर्व जनां । जाणुनी देह सर्वातरा ।।६।।

# " निसर्ग "

– अभंग

निसर्गाची शक्ति । असे ती ईश्वरी ।
त्यावीण नसे ती । जगी अन्य दुजी ।।धृ।।
निराकारातूनी । साकारांत आला ।
शरीररुपी तरे । निसर्गची झाला ।।१।।
सुर्य चंद्र राही । नयनाचे रुपा ।
करुनिया सुखे । सर्व भक्त जना ।।२।।
पृथ्वीचे स्वरुपी । राहीला तो पोटी ।
देवोनी अमृत । धन्य झाला तो जगी ।।३।।

# वंदन

ताल – त्रिताल

वंदन माझें तुला शिवशंकरा सच्चिदानंदा । तारी तारी तूं मला ।।धृ।।

निराकार तूं निर्गुणरुपा । ओंकारमय तूं सदाशिवा ।

भक्ताकारण येशी साकारा ।।१।।

ॐनम:शिवाय षडाक्षरीमंत्र । हृदयीं जपता होऊनी तन्मय ।

करूनी घेशी पावन त्यांना ।।२।।

कैळास तुझे वसतीस्थान । पार्वती गणेश जाया नि सूत ।

नंदी वाहन ठेवी बाजूला ।।३।।

सदाशिव नाम ज्याचे वदनी । होईल जीत भवसागरी ।

होऊनी देवता तूं कल्याणकारी ।।४।।

सोमनाथ हा सदा राही भक्त । प्रार्थितो तुजला रात्रंदीन ।

ठेवी तूं सुखशांति जनाला ।।५।।

# अहंकार

धरुं नको अहंकार । मानवा देही तुझ्या रे भगवान ।।धृ।।

जीव राही शिवरूपात । वास त्याचा शरीरात ।

करी देहाचा संभाळ ।। मानवा ।।१।।

ब्रह्मा विष्णू शिव शंकर । रामकृष्ण हरि विठ्ठल ।

प्रगटती आत्म रुपात ।। मानवा ।।२।।

शांता दुर्गा अंबा भवानी । काली लक्ष्मी सरस्वती ।

येती तुझ्या जीवनात ।। मानवा ।।३।।

असेच देव देवांगण । भक्ति श्रद्धा निष्ठा धरुन ।।

प्रगटी तुझ्या हृदयात ।। मानवा ।।४।।

वंदुनी बोले सोमनाथ । देवदेवता राही जीवात ।

वृथा नको अहंकार ।। मानवा ।।५।।

# सुखदुःख

भावगीत

ताल – दादरा

सुख सांगावे देवासी । दुःख सांगावे मनासी ।।धृ।।

सुखदुःखाच्या सांगडी । जाणूनी घ्यावी ओळखुनी ।
जगी तोचि एक राही । भाव तेथे देव पाही ।।१।।

हंसणे रडणे त्याचे करी । मायाममता त्याचे दारी ।।
सुखदुःखाचा वाटेकरी । होतो आप आपुले परी ।।२।।

सुखाच्या ठायी दानव । दुखाच्या ठायी देव ।
पाहुनी एकमेका भाव । घ्यावी खूण अंतरी ।।३।।

पर्वताची शोभा दुरुन । दिसते मनी ही वरून ।
जवळी जाता दुखःमय । देह तो आठवी सुखमय ।।४।।

सोमनाथ विनवी सर्वा । खंत नसावी सुखदुःखा ।
करा प्रेम सर्व जनां । जाणुनी देह सर्वातरा ।।६।।

# " निसर्ग "

– अभंग

निसर्गाची शक्ति । असे ती ईश्वरी ।
त्यावीण नसे ती । जगी अन्य दुजी ।।धृ।।

निराकारातूनी । साकारांत आला ।
शरीररुपी तरे । निसर्गची झाला ।।१।।

सुर्य चंद्र राही । नयनाचे रुपा ।
करुनिया सुखे । सर्व भक्त जना ।।२।।

पृथ्वीचे स्वरुपी । राहीला तो पोटी ।
देवोनी अमृत । धन्य झाला तो जगी ।।३।।

अवयव झाले । कष्ट उठावया ।
करोनिया शांती । सर्व शरीराला ॥ ४ ॥
ज्ञानामृतासाठी । झाला ज्ञानदेव ।
दावुनिया ज्ञान । आत्मज्ञान श्रेष्ठ ॥५॥
निसर्गाची शोभा । झाली ती ईश्वरी ।
सुंदर ते ध्यान । ठेवूनी शरीरी ॥६॥
सोमनाथ सांगे । पाहा हा पुरावा ।
निसर्गाची शक्ति । पाहोनिया शोभा ॥७॥

॥ॐ॥

# ॥ षडाक्षरी - मंत्र ॥

ॐकारं बिंदु संयुक्तं नित्यंध्यायन्ति योगिनः ।
कामदं मोक्षदं चैव ओंकाराय नमोनमः ॥१॥
नमंति ऋषयो देवा नमंत्यप्सरसांगणाः ।
नरा नमंती देवेशं नकाराय नमोनमः ॥२॥
महादेवं महात्मानं महाध्यानं परायणं ।
महापापहरं देवं मकाराय नमोनमः ॥३॥
शिवं शान्तं जगन्नाथं लोकानुग्रहकारकम ।
शिवं एकं पदं नित्यं शिकाराय नमोनमः ॥४॥
वाहनं वृषभो यस्य वासुकीं कंठभूषणम् ।
वामे शक्तिधरं देवं वकाराम नमोनमः ॥५॥
यत्र यत्र स्थितो देवाः सर्व व्यापि महेश्वरा ।
यो गुरू सर्वं देवानाम् मकाराय नमोनमः ॥६॥

——

# श्रीकालिकास्तोत्र

ॐ कालिकाकालमाताच कालानलसमद्युति: ।
कपर्दिनी करालास्या करूणामृतसागरा ॥१॥
कृपामयी कृपाधारा कृपापारा कृपागमा ।
कृशानु: कपिला कृष्णा कृष्णानन्दा विवर्धिनी ॥२॥
कालशक्ति: कामरूपा कामपाशविमोचिनी ।
कादम्बिनी कलाधारा कलिकल्मपनाशिनी ॥३॥
कुमारी पूजनप्रीता कुमारी पूजकालया ।
कुमारी भोजनानंदा कुमारीरूपधारिणी ॥४॥
कदम्बवनसंचारा कदम्बवनवासिनी ।
कदम्बपुष्पसंतोषा कदंबापुष्पमालिनी ॥५॥
किशोरी कलकंटाच कलनादनिनादिनी ।
कादंबरीपानरता तथा कादंबरीप्रिया ॥६॥
कपालपात्रनिरता कंकालमाल्यधारिणी ।
कमलासनसंतुष्टा कमलासनवासिनी ॥७॥
कमलालयमध्यस्था कमलामोदमोदिनी ।
कलहंसगति: क्लैब्यनाशिनी कामरूपिणी ॥८॥
कामरूपकृतावासा कामपीठविलासिनी ।
कमनीया कल्पलता कमनीयविभूषणा ॥९॥
कमनीयगुणाराध्या कोमलांगी कृशोदरी ।
कारणामृतसंतोषा कारणानंदसिद्धिदा ॥१०॥
कारणानंदजापेष्टा कारणार्चनहर्षिता ।
कारणार्णवसंमग्ना कारणाव्रतपालिनी ॥११॥
कस्तूरीसौरभामोदा कस्तूरीतिलकोज्ज्वला ।
कस्तूरीपूजनरता कस्तूरीपूजकप्रिया ॥१२॥
कस्तूरीदाहजननी कस्तूरीमृगतोषिणी ।
कस्तूरीभोजनप्रीता कर्पूरचन्दनोक्षिता ॥१३॥

कर्पूकारणाल्हादा कर्पुरामृतपायिनी ।
कर्पूरसागरस्नाता कर्पूरसागरालया ॥१४॥
कूर्चबीजजपप्रीता कूर्चजापपरायणा ।
कुलीना कौलिकाराध्या कौलिकप्रियकारिणो ॥१५॥
कुलाचाराकौतुकिनी कुलमार्गप्रदर्शिनी ।
काशीश्वरी कष्टहर्त्री काशीशवरदायिनी ॥१६॥
काशीश्वर कृतामोदा काशीश्वर मनोरमा ।
कलमंजीरचरणाक्कणत्कांची विभूषणा ॥१७॥
कांचनाद्रिकृतागारा कांचनाचलकौमुदी ।
कामबीजजपानंदा कामबीजस्वरूपिणी ॥१८॥
कुमतिघ्ना कुलीनार्तिनाशिनी कुलकामिनी ।
क्रीं ऱ्हीं श्रीं मंत्रवर्णेन कालकंटकघातिनी ॥१९॥
इत्याद्या कालिकादेव्याः शतनामप्रकीर्तितम् ।
ककारकूटघटितं कालीरूपस्वरूपकम् ॥२०॥
पूजाकाले पठेद्यस्तु कालिकाकृत मानसः ।
मंत्रसिद्धिर्भवेदाशु तस्य काली प्रसीदति ॥२१॥

# श्रीसूक्तम्

हरि ॐ । हिरण्यवर्णांहरिणीं सुवर्णरजतस्त्रजाम् ।
चंद्रांहिरण्ययीं लक्ष्मींजातवेदोमआवह ।
तामआवहजातवेदोलक्ष्मीमनपगामिनीम् ।
यस्यांहिरंण्यंविदेयंगामश्वंपुरूषानहम् ।
अश्वपूर्वांरथमध्यां-हस्तिनादप्रबोधिनीम् ।
श्रीयंदेवीमुपव्हयेश्रीर्मादेवीजुषताम् ।
कांसोस्मितांहिरण्यप्राकारामार्द्रांज्वलंतींतृप्तांतर्पयंतीम् ।
पद्मेस्थितांपद्मवर्णांतामिहोपव्हयोश्रियम् ।

चंद्रांप्रभासांयशसाज्ज्वलंतीं श्रियंलोकेदेवजुष्टामुदाराम् ।
तांपद्मिनीमींशरणमहंप्रपद्येऽलक्ष्मीर्मेनश्यतांत्वावृणे ॥१॥
आदित्यवर्णेतपसोधिजातोवनस्पतिस्तववृक्षोथबिल्वः ।
तस्यफलानितपसानुदंतुमायांतरायाश्चबाह्याअलक्ष्मीः ॥
उपैतुमांदेवसखःकीर्तिश्चमणिनासह ।
प्रादुर्भतोसुराष्टेस्मिनकीर्तिमृद्धिददातुमे ॥
क्षुत्पिपासामलांज्येष्ठामलक्ष्मींनाशयाम्यहं ।
अभूतिमसमृद्धिंचसर्वांनीर्णुदमेगृहात् ॥
गंधद्वारांदुराधर्षांनित्यपुष्टांकरीषिणीं ।
ईश्वरींसर्वभूतानांतामिहोपव्हयेश्रियम् ॥
मनसःकाममाकूतिवाचःसत्यमशीमहि ।
पशूनांरुपमन्यस्यमयिश्रीः श्रयतांयशः ॥२॥
कर्दमेनप्रजाभूतामयिसंभवकर्दम् ।
श्रियंवासयमेकुलेमातरंपद्ममालिनीम् ॥
आपःस्त्रजंतुस्निग्धानिचिक्लीतवसमेगृहे ।
निचदेवींमातरंश्रियंवास्यमेकुले ॥
आर्द्रांयःकरिणींयष्टिसुवर्णांहेममालिनीम् ।
सूर्यांहिरण्यमयींलक्ष्मीजातवेदोमआवह ॥
आंर्द्रांपुष्करिणींपुष्टिंपिंगलांपद्ममालिनीम् ।
चंद्रांहिरण्मयींलक्ष्मींजातवेदोमआवह ॥
तामआवहजातवेदोलक्ष्मींमनपगामिनीम् ।
यस्यांहिरण्यंप्रभूतंगावोदांस्योश्वान्विंदेयंपुरुषानहम् ॥
यःशुचिप्रयतोभूत्वाजुहुयादाज्यामन्वहं ।
सूक्तंपंचदशर्चंचश्रीकामःसततंजपेत ॥३॥

# श्रीसरस्वतिस्तोत्र

नमोस्तुते सरस्वति त्रिशुलचक्रधारिणी ।
सितांबरावृते शुभे मृगेंद्रपीठसंस्थिते ॥
सुवर्णबंधुराधरे सुझल्लरीशिरोरूहे
सुवर्णपद्मभूषिते नमोस्तुते महेश्वरि ॥१॥

पितामहादिभिर्नुते सकांतिलुप्तचंद्रमे ।
सरत्नमालयावृते भवाब्धिकष्टहारिणि ॥
तमालहस्तमंडिते तमालभालशोभिते ।
गिरामगोचरे इले नमोस्तुते महेश्वरि ॥२॥

स्वभक्तवत्सलेऽनघे सदाऽपवर्गभोगदे ।
दरिद्रदुःखःहरिणि त्रिलोकशंकरीधरी ॥
भवानि भीम अंबिके प्रचंडतेजउज्ज्वले ।
भुजाकलापमंडिते नमोस्तुते महेश्वरि ॥३॥

प्रपन्नभीतिनाशिके प्रसूनमाल्यकंधरे ।
धियस्तमोनिवारिके विशुद्धबुद्धिकारिके ॥
सुरार्चितांघ्रिपंकजे प्रचंड विक्रमेऽक्षरे ।
विशालपद्मलोचने नमोस्तुते महेश्वरि ॥४॥

हतस्त्वया स दैत्य धुम्रलोचनो यदा ।
रणे तदा प्रसूनवृष्टच स्त्रिविष्टपे सुरैःकृताः ॥
निरीक्ष्य तत्र ते प्रभामलज्जत प्रभाकर ।
स्त्वये दयाकरे ध्रुवे नमोस्तुते महेश्वरि ॥५॥

ननाद केसरी यदा चचाल मेदिनी तदा ।
जगाम दैत्यनायकः स्वसेनया द्रुतं भिया ॥
सकोपकंपदच्छदे सचंऽमुंडघातिके ।
मृगेंद्रनादनादिते नमोस्तुते महेश्वरि ॥६॥

मराठी ग्रंथालय
2363
दा. क्र.
22408

कुचंदनार्चितालिके सितोष्णवारणाधरे ।
सवर्करानने वरे निशुंभशुंभमर्दिके ।
प्रसीद चंडिके अजे समस्तदोषघातिके ।
शुभामतिप्रदेऽचले नमोस्तुते महेश्वरि ॥७॥

त्वमेव विश्वधारिणी त्वमेव विश्वकारिणी ।
त्वमेव सर्वंहारिणी न गम्यसेऽजितात्मभिः ॥
दिवौकसां हिते रता करोषि दैत्यनाशनं ।
शताक्षिरक्तदंतिके नमोस्तुते महेश्वरि ॥८॥

---

# प्रार्थना

REFBK-0022504
REFBK-0022504

न मंत्रं नो यंत्रं तदपि च न जाने स्तुतिमहो ।
न चाव्हानं ध्यानं तदपि च न जाने स्तुतिकथाः ॥
न जाने मुद्रास्ते तदपि च न जाने विलपनं ।
परं जाने मातस्त्वदनुसरणं क्लेशहरणं ॥१॥

विधेरज्ञानेन द्रविणविरहेणालसतया ।
विधेयाशक्यत्त्वात्तव चरणयोर्याच्युतिरभूत ॥
तदेतत्क्षन्तव्यं जननि सकलोद्धारिणी शिवे ।
कुपुत्रो जायेत क्वचिदपि कुमाता न भवति ॥२॥

पृथिव्यां पुत्रास्ते जननि बहवः सन्तिसरलाः
परं तेषां मध्ये विरलतरलोऽहं तव सुतः ॥
मदीयोयं त्यागः समुचिमिदं नो तव शिवे ।
कुपुत्रो जायेत क्वचिदपि कुमाता न भवति ॥३॥

जगन्मातर्मातस्तव चरणसेवा न रचिता ।
न वा दत्तं देवि द्रविणमपि भूयस्तव मया ॥
तथापि त्वं स्नेहं मयि निरूपमं यत्प्रकुरूषे ।
कुपुत्रो जायेत क्वचिदपि कुमाता न भवति ॥४॥

परित्यक्ता देवा विविध विधसेवाकुलतया ।
मया पंचाशीतेरधिकमपनीते तु वयसि ॥
इदानीं चेन्मातस्तव यदि कृपा नापि भवता ।
निरालंबो लंबोदरजननि कं यामि शरणं ॥५॥

श्वपाको जल्पाको भवति मधुपाको पमगिरा ।
निरातंको रंको विहरति चिरं कोटिकनकैः ।
तवापर्णे कर्णे विशति मनुवर्णे फलमिदं ।
जनः को जानीते जननि जपनीयं जपविधौ ॥६॥

चिताभस्मालेपो गरलमशनं दिक्पटधरो ।
जटाधारी कण्ठे भुजगपतिहारी पशुपतिः ।
कपाली भूतेशो भजति जगदीशैकपदवी ।
भवानी त्वपाणिग्रहणपरिपाटीफलमिदम् ॥७॥

न मोक्षस्याकांक्षा भव विभवांछाऽपि च न मे ।
न विज्ञानापेक्षा शशिमुखी सुखेच्छापि न पुनः ।
अतस्त्वां संयाचे जननि जननं यातु मम वै ।
मृडानीं रूद्राणी शिव शिव भवानीति जपतः ॥८॥

नाराधिताऽसि विधिना विविधोपचारैः ।
किं रूक्ष चिंतनपरैर्न कृतं वचोभिः ।
श्यामे त्वमेव यदि किंचन मय्यनाथे ।
धत्से कृपानुचितमंब परं तवैव ॥९॥

आपत्सु मग्नः स्मरणं त्वदीयं ।
करोमि दुर्गे, करूणार्णवेशि ।
नैतच्छतत्वं मम भावयेथाः ।
क्षुधातृषार्थं जननीं स्मरन्ति ॥१०॥

जगदंब विचित्रमंत्र किं । परिपूर्णा करूणास्त चेन्मयि ।
अपराधपरंपरावृत्तं । न हि माता समुपेक्षते सुतम् ॥११॥

मत्सम पातकी नास्ति पापघ्नी त्वत्समा न दि .
एवं ज्ञात्वा महादेवि यथायोग्यं तथा कुरू ॥१२॥